# Mukt Shabd

## UGC CARE JOURNAL

ISSN NO : 2347-3150

MUKt SHABd
JOURNAL

ज्ञान-विज्ञान विमुक्तये
UGC
University Grants Commission
Approved Journal List

Impact Factor : 4.6

A Peer Reviewed/ Referred Journal

Edited By
MSJ : Mukt Shabd Journal
http://shabdbooks.com/

Copyrights @ 2020 MSJ. All Rights reseved



Scanned with OKEN Scanner

# भारताच्याअनुक्रमणिका

## मराठी विभाग


1) महिला सबलीकरणात गांधीजींचे योगदान -डॉ. अल्का बाबाराव सोमवंशी 1
2) महात्मा गांधी व पंचायतराज -प्रा. संजय अंकुशराव जगताप 5
3) ग्रामविकासाबाबत म. गांधीजीचे विचार -प्रा. बी. पी. पवार 7
4) महात्मा गांधीजींचे आर्थिक विचार -प्रा. बळीराम पवार 10
5) सामाजिक अध:पतन रोखण्यासाठी सद्यस्थितीत गांधी विचाराची समर्पकता -डॉ. बाजीराव मा. पाटील 12
6) महात्मा गांधी - धर्मविषयक दृष्टिकोन - अलका पद्माकरराव चिखुर्डेकर 15
7) म. गांधी प्रणित व्यक्ति स्वातंत्र्य संकल्पना व प्रस्तुतता- प्रा.डॉ.दत्ता मा. कुंचेलवाड 17
8) महात्मा गांधी यांचा भारतीय प्रशासन व राजकारणावर असणारा प्रभाव - प्रा.आर.एस.धप्पाधुळे 22
9) एकविसाव्या शतकात महात्मा गांधीजींच्या सत्य व अहिंसा विचारांची प्रासंगिकता -डॉ.डी. डी. क्षीरसागर 25
10) महात्मा गांधी यांचे सत्याग्रह विषयक विचार -प्रा. डॉ. पावडे के. डब्ल्यु. 29
11) महात्मा गांधी यांच्या विचारांची प्रासंगिकता -डॉ.डोंगरे एल.बी. 31
12) राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचे शिक्षण विषयक विचार -डॉ. संजय शेणमारे, ग्रंथपाल 34
13) गांधी विचारांची वर्तमान प्रस्तुतता/प्रासंगिकता (ग्रामीण भारताच्या संदर्भात) -प्रा.डॉ. कविता सोनकांबळे 36
14) महात्मा गांधींचे शिक्षण कार्यातील योगदान -प्रा.डॉ.पराग दि.साले. 39
15) म.गांधी यांच्या सामाजिक विचाराची प्रस्तुतता : एक समाजशास्त्रीय अध्ययन -प्रा.डॉ.पी.के.पवार 42
16) महात्मा गांधी : स्वच्छतेचे पुजारी -डॉ. माणिक पंडीतराव शिंदे 44
17) गांधी विचारांची प्रासंगिकता - प्रा.डॉ.जितेंद्र पांडूरंगराव काळे 46
18) महात्मा गांधीच्या ग्रामोध्दार संकल्पनेत खादीचे महत्व - प्रा. कोमल नारायण काळबांडे 48
19) गांधीवाद आणि जागतिकीकरण - प्रा.दत्ता नामदेव कोटरंगे 50
20) महात्मा गांधीजीचे शिक्षणविषयक विचार - प्रा. पाटील एस. एन. 53
21) गांधींची ग्रामस्वराज्य संकल्पना - प्रा. मेघा शरचंद्र पाठक 56
22) विश्वशांतीदूत म. गांधीजी आणि राजकारण - प्रा. डॉ. दत्ताजी हुलप्पा मेहत्रे 58
23) ग्रामीण विकासातील महात्मा गांधीजींचे योगदान : एक अभ्यास - प्रा.डॉ. बी.एम.नरवाडे 61
24) महात्मा गांधीजींचे विचार आणि भारत सरकार द्वारे केलेला ग्राम स्वराज्य अभियानाचा आढावा. (14 एप्रिल 2018 ते 5 मे 2018) - प्रो.पल्लवी प्रभाकरराव जोशी 64
25) महात्मा गांधीजींच्या विचारांची वर्तमान काळातील उपयुक्तता -डॉ.पंजाब चव्हाण 66
26) महात्मा गांधीजींच्या विचारांची प्रासंगिकता - डॉ. वैशाली शांताराम बागुल 69
27) महात्मा गांधीजीचे अहिंसा तत्त्व - प्रा. सय्यद आर. आर. 72
28) म.गांधींची सत्याग्रह संकल्पना - एक दृष्टीक्षेप -प्रा.डॉ.राजेंद्र ज्ञानोबाराव शिंदे 74
29) महात्मा गांधीजी व शेतकरी चळवळ - प्रा.नारायण राजुरवार 78
30) नागरी समाज व गांधी - प्रा.सावदे राम पांडुरंग 83




Scanned with OKEN Scanner

ISSN NO : 2347-3150

# महात्मा गांधी यांचे सत्याग्रह विषयक विचार

*प्रा. डॉ. पावडे के. डब्ल्यु.*

*इतिहास विभाग प्रमुख*

*शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय, कळंब*

**प्रस्तावना:** भारताला इंग्रजी जोखडातून मुक्त करण्यासाठी अनेक महापुरूषांनी, समाज सुधारकांनी, विचारवंतांनी आपआपल्या परीने विचार मांडले, कार्य केले, रूपरेषा आखल्या. अशा अनेक व्यक्तींमध्ये महात्मा गांधी यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. भारतीयांनी ब्रिटिश राजवटीविरोधात जो अनेक वर्षे लढा दिला या लढ्याचे नेतृत्व करण्यासाठी भारतीय राष्ट्रीय सभेची जी पुढे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस म्हणून पुढे आली त्या चळवळीच्या कार्याचे विभाजन तीन कालखंडात केले जाते. ज्यामध्ये मवाळ कालखंड, जहाल कालखंड आणि गांधी कालखंड. यामध्ये ज्या १९२० ते १९४७ या प्रदिर्घ कालखंडाचा उल्लेख आपण गांधी युग म्हणून करतो. याचे कारण या काळात भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे पूर्णपणे नेतृत्व करण्याचे कार्य महात्मा गांधी यांनी केले होते. ब्रिटिश राजवटीत खितपत पडलेल्या, गुलामीचे जीवन जगणाऱ्या ऐतदेशीय व्यक्ती, मानसमूह वेगवेगळे समाज यांच्यामध्ये भारत मातेच्या स्वातंत्र्याची जाणीव निर्माण करून तळागाळातील व्यक्तींमध्ये स्वातंत्र्याची उर्मी निर्माण करून त्यांना स्वातंत्र्य चळवळीत सक्रीयपणे सहभागी होण्यासाठी प्रेरीत करण्याचे महान कार्य महात्मा गांधींनी केले. एवढेच नव्हे तर वेळोवेळी या मानव समूहाला अनेक प्रकारचे कृतीशील कार्यक्रम देऊन स्वातंत्र्याची ज्योत या भारतीय समाज मनात सतत तेवत ठेवण्याचे कार्य त्यांनी केले. या स्वातंत्र्य संग्रामाच्या लढ्या बरोबरच समाजाला नवविचाराने आपल्या कृतीने एक नवी दिशा देण्याचे कार्यही त्यांनी केले. त्यांच्या या कार्याची नोंद म्हणजे आज घडीला जगातील ज्या व्यक्तींवर सर्वात जास्त लेखन झाले आहे. या यादीमध्ये सर्वोच्च स्थानी त्यांच्याच नावाची नोंद झालेली दिसून येते. महात्मा गांधी यांनी आपल्या विचारातून, कृतीतून, संघर्षमय जीवनातून अनेक पैलूंना विशिष्ट स्थान मिळवून दिले. अनेक नव मानवी मूल्यांना जन्म दिला. अशा त्यांच्या जीवनातील अनेक पैलूंपैकी एक असणाऱ्या 'सत्याग्रह' या पैलूवर प्रस्तुत शोधनिबंधातून प्रकाश टाकण्यात आला आहे.

**सत्याग्रह विषयक विचार:** महात्मा गांधीजी म्हणतात, 'सत्याग्रह शब्दाची उत्पत्ती होण्यापूर्वीच मूळ वस्तुची उत्पत्ती झाली होती. त्याच्या उत्पत्तीची वेळ ही काय होती हे मी ओळखुच शकलो नव्हतो.' गुजराथीमध्ये त्याला 'पॅसिव्ह रेझिस्टन्स' या इंग्रजी नावानेच सर्वजन ओळखू लागले होते. गोऱ्या लोकांच्या (ब्रिटिशांच्या) एका सभेमध्ये दिसून आले की, 'पॅसिव्ह रेझिस्टन्स' याचा अर्थ संकुचित अर्थ केला जातो. हे निर्बलाचे हत्यार आहे अशी समजूत आहे. त्यामुळेच त्यात द्वेषाला जागा राहते आणि त्याचे अखेरचे स्वरूप हो हिंस्से मध्ये ही प्रकट होऊ शकते. त्या समजूतीचा विरोध करून भारतीय लोकांच्या लढ्याचे यथार्थ स्वरूप समजावून सांगणे गरजेचे वाटल्याने त्यांनी तेंव्हापासूनच भारतीय स्वातंत्र्य लढ्याची सर्व कोष बोध करून देण्यासाठी नवीन अशा शब्दाची जरूरी जाणवत असल्याने त्यांनी नव मार्गाचा व त्याला समर्थ असणाऱ्या शब्दाचा शोध घेतल्याबद्दलचे वर्णन महात्मा गांधी यांनी स्वतःच्या आत्मचरित्रात केले आहे. ब्रिटिशांनी भारतात जे नवीन कायदे अस्तित्वात आणले होते त्याला भारतीयांकडून जो विरोध होता त्या विरोधाला 'अप्रत्यक्ष प्रतिकार' असे नाव महात्मा गांधी व स्वातंत्र्य लढ्यातील इतर लोकांनी दिले होते व याच शब्दाचा वापरही त्यांनी काही काळ केला होता. परंतु या नवविषयी महात्मा गांधी स्वतः म्हणावे तसे समाधान नसल्याने त्यांनी या विरोधाच्या नावच्या पर्यायी किंवा समान अर्थी नाव शोधण्यासाठी १९०७ साल मधील 'इंडियन ओपीनियन' यात नाव शोधून देणाऱ्या बक्षीस देण्याचे जाहीर केले. ते मगनलाल यांनी जिंकले. त्यांनी या शब्दाला पर्यायी शब्द म्हणून 'सदाग्रह' किंवा 'सदाचाराचा आग्रह' असे नाव सुचविले होते. या नावातच गांधींनी 'सत्याग्रह' किंवा 'खरेपणाचा आग्रह' असा फेरबदल केला व त्याचा स्विकार पुढे केला. प्रेम, न्याय आणि आत्मा यांना समानार्थी शब्द म्हणून सत्याचा प्रयोग करताना आणि आग्रहाला ताकदीबरोबर तोलताना गांधी सत्याग्रहच इंग्रजीमध्ये सत्य-आग्रह किंवा प्रेम-आग्रह किंवा आत्मा-आग्रह असे भाषांतर करण्यास संमती देतात. अमेरिकन तत्वज्ञ विल्यम जेम्स यांनी युद्धाला नैतिक पर्याय शोधण्याचे आवाहन केले होते. ते आपल्याला सत्याग्रह रूपाने सापडले आहे असे गांधीजींना वाटत असावे. यंग इंडिया मध्ये सत्याग्रह विषयी गांधीजी विचार मांडताना म्हणतात कानुन की अवज्ञा सच्चे भाव से और आदर पूर्वक की जाए, इसमे किसी प्रकार की उद्धतता न हो और वह किसी ठोस सिद्धान्त पर आधारित हो तथा उसके पीछे द्वेष या तिरस्कार का लोभ भी न हो यह आखिरी कसौटी सबसे ज्यादा महत्त्व की है, तो ही उसे शुद्ध सत्याग्रह कहा जा सकता है. परंतू आज घडीला ही लोक हे सत्याग्रह या शब्दाचा अर्थ अत्यंत नेमस्त अथवा भित्रेपणाचा वापर म्हणून हिनवत परंतु गांधीजी यावर एके ठिकाणी म्हणतात. या शब्दाचा रचेता या नात्याने सत्याग्रहातील अदृष्य किंवा दृष्य हिंसा असो अथवा कोणत्याही मार्गाची हिंसा असो. ज्यामध्ये कर्माद्वारे, मनाद्वारे होणारी



२८

Scanned with OKEN Scanner

असेल किंवा बोलण्यातून होणारी असेल. या सर्व प्रकारच्या हिंसेला सत्याग्रहात स्थान नसते. प्रतिपक्षी असणाऱ्या पक्षाच्या नाशाविषयी अथवा त्यांच्या नुकसाना विषयी विचार, कृती करणे अथवा बोलणे म्हणजे सत्याग्रहाचे उल्लंघण होय. त्यामुळे असे म्हणता येईल की, सत्याग्रह ही एक शितल वस्तु आहे. त्यांच्यापासून कोणाचेही नुकसान होणार नसते. त्यामुळे सत्याग्रहाचा मार्ग अवलंबताना त्यामागे प्रतिपक्षा विषयी राग किंवा द्वेषाची भावना असता कामा नये. सत्याग्रह हा मनःपूर्वक विनयपूर्ण असेल ज्यात उर्मटपणा नसेल जो भरीव तत्वावर आधारित असेल आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यात कोणाविषयीही द्वेष, तिरस्कार यांचा लवलेशही राहणार नाही. अशाला शुद्ध सत्याग्रह म्हणता येईल. सत्याग्रह हे वैध उपायापैकी एक अत्यंत प्रभावी साधन असल्यामुळे त्याचा उपयोग करण्यापूर्वी इतर सर्व उपायांचा अवलंब करून पाहिला पाहिजे. ज्यामध्ये सत्याग्रह ज्या बाबीच्या विरोधात करावयाचा आहे. त्या संबंधीतील सर्व लोकांना भेटून त्या संबंधीचा सर्व लेखाजोखा समजावून सांगणे, त्यातील गैर बाबी विषयी त्यांचे मन परावर्तीत करण्याचा किंवा वळविण्याचा प्रयत्न करणे, त्याविषयीच्या विरोधा बाबत जनजागृती करून त्याचा काही फायदा होतो का हे पाहणे. अशा प्रकारे सत्याग्रह पूर्व विषयाबाबतची सर्व अंगाने चाचपणी करून त्याबद्दल घडविण्याविषयी प्रयत्न करणे. जेव्हा हे सर्व पर्याय निरूपयोगी ठरत असतील तरच शेवटी सत्याग्रहाचा मार्ग अंगिकारला पाहिजे. याचे कारण म्हणजे सत्याग्रहामध्ये व्यक्ती हा आपले सर्वस्व पणाला लावत असतो.सत्याग्रहाने सत्याग्रह सुरू होण्यापूर्वी आपल्या सहकार्य असणाऱ्या सत्याग्रहीविषयी वेगळी किंवा चुकीची अशी काही तरी धारणा बनवुन घेऊ नये. अशी धारणा बनविणे म्हणजे सत्याग्रहाच्या सिद्धता पूर्ततेला विरोधच केल्यासारखे असते. अशा प्रकारची मनात धारणा निर्माण करणे म्हणजे सत्याग्रहीमध्ये आत्मविश्वासाची कमतरता असल्यासारखेच आहे. तसेच सहकारी असणारे आपले सत्याग्रही हे आपले विचार खुल्या मनाने ऐकतील की नाही, अशा प्रकारची शंका उपस्थित करण्यासारखेच होय. असे विचार सत्याग्रहात व सत्याग्रहीच्या अंगी गांधीजींना मान्य नव्हते. त्यांच्या मते असे विचार अंगीकारून एखादा सत्याग्रहात सहभागी होणे म्हणजे स्वतःचा वेळ वाया घालविणे होय. त्यामुळे सत्याग्रह हे मानवी जीवनाचे शास्त्र व कला असल्यामुळे जीवनाचा जसजसा विकास होत जाईल तसतसे त्याचे स्वरूपही परीपूर्ण होत जात असते. मानवी स्वभावावरील अढळ मनाचा आंतरिक विश्वास हाच सत्याग्रहाचा गाभा असतो. प्रत्येक गोष्टीचा खुल्या मनाने सत्याग्रही विचार करायला तयार असला पाहिजे. तसेच सत्याग्रह हा अहिंसेच्या तत्वाला धरूनच असला पाहिजे. अहिंसात्मक प्रतिकार म्हणजे सत्याग्रह. सत्याग्रह हा प्रतिकाराचा श्रेष्ठ आणि अधिक परिणामकारक प्रकार आहे. त्यात प्रतीपक्षाची हानी करावयाची नसते, तर त्याचे मत परिवर्तन करायचे असते. या सत्याग्रहीवृत्तीमध्ये कुठल्याही प्रकारच्या स्वार्थाला स्थान नसते. ही कृती निर्भयतेने पार पाडली जात असते. सत्याग्रहीचा प्रतिकार हा दुसऱ्याच्या हृदयाशी जाऊन भिडत असतो आणि त्यामुळे तो दुराचार सोडून देत असतो. अशी गांधीजीची सत्याग्रह विषय भावना होती. गांधीजीच्या मते, आत्मसंयम, ब्रह्मचर्य, शाकाहार, कृत्रिम व बनावट सभ्यतेपासून विरक्ती, स्वेच्छपूर्ण दारिद्र्य, अनासक्ती व अपरिग्रह आश्रमवास आणि गीतेतील कर्मयोगाचे आचरण इत्यादी गोष्टी सत्याग्रही होण्यासाठी आवश्यक असतात. सत्याग्रहाचा अवलंब वैयक्तिक तसेच सामूहिक पातळीवर करता येतो. दोन्ही सत्याग्रह नैतिक पातळीवरच करायचे असून त्याचे मुल्यमापनही नैतिक निकषावरच केले जाऊ शकते असे गांधींना वाटते.सारांश रूपाने असे म्हणता येईल की आज आपणास महात्मा गांधीचे नाव आठवले की सत्याग्रह हे एक त्यांचे साधन म्हणून आठवते. याचे कारण गांधी आणि सत्याग्रह हे जणू समानार्थी शब्द बनले आहेत. असे असले तरी सत्याग्रहा हा मार्ग सोपा नव्हता. तो एक खडतर मार्ग होता. त्याला साधनेची आवश्यकता असते. ईश्वराप्रती निष्ठा असते. मानवी शरीरापेक्षाही आंतरिक मन व आत्मा श्रेष्ठ मानल्याशिवाय ही साधना पार पाडता येत नाही. ही साधना पार पाडतांना स्वहितापेक्षा समाजहितावरोबरच, प्रतीपक्षाच्या हिताचाही विचार करण्याची भावना मनात बाळगणे गरजेचे असते. थोडक्यात स्वार्थाच्या कोषात अडकलेली व्यक्ती सत्याग्रही होऊच शकत नाही. त्यासाठी सत्याग्रहाच्या ठिकाणी नैतिक बळ मोठे असावे लागते. त्यामुळेच महात्मा गांधीच्या सत्याग्रहाच्या साधनेत नैतिक दर्जाला फार महत्त्व देण्यात येते.

**संदर्भसूची :**


१) अनु. पटवर्धन सी. पु., सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापुर. २०१८.
२) अनु. देशपांडे मुक्ती शिरीष, मोहनदास, मेहता पब्लिशिंग हाऊस.
३) संग्राहक प्रभु आर. के., मेरे सपनों का भारत, नवजीवन मुद्रणालय अहमदाबाद.
४) महात्मा गांधी, महात्मा गांधी विचार संग्रह, रिया पब्लिकेशन्स, कोल्हापुर, २०१६.
५) अनु. यशवंत तेंडुलकर, गांधीजी के जीवन प्रसंग, सस्ता साहित्य मंडल, नई दिल्ली, १९५०.
६) प्रा. तिजोरे रा. अं., प्रा. जागीरवार प्र. ज., राज्यशास्त्राचे सिद्धान्त व राजकीय विचारवंत, श्री मंगेश प्रकाशन, नागपुर, १९७९.
७) डॉ. भोळे भास्कर लक्ष्मण, भारतीय आणि पाश्चिमात्य राजकीय विचार, पिंपळापुरे अॅण्ड पब्लिशर्स, नागपुर, १९८०.
८) डॉ. डोळे ना. य., भारतीय राजकीय विचारवंत, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, १९९९.


▪ ▪ ▪ ▪ ▪



89

Scanned with OKEN Scanner